# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

## समाजशास्त्र विभाग

## Notice

दिनांक - २४ / ०४ /२०२५

समाजशास्त्र विभागातील B.A.III च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या सत्रातील अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे प्रोजेक्ट दि. ३० / ०४ /२०२५ पर्यंत जमा करावे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

प्रा. एच. व्ही. चामे

विभाग प्रमुख

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Student Marks Entry

Course: B.A. - TY SEM - VI

Session:MAR - APR 2025

**Subject: SOCIOLOGY PAPER XV (DSE1021F4) - CIE**

**Min/Max : 6/15**

| Sr.No. | PRN No | Seat No | Student Name | Marks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2022014249 | 4833009 | TODKAR VAISHNAVI SAMBHAJI | 14 |
| 2 | 2022014040 | 4833025 | DESAI RUHANA SARDAR | 15 |
| 3 | 2022014227 | 4833026 | SATHE SAKSHI DILIP | 15 |
| 4 | 2022014010 | 4833027 | BEDKALE SAMIKSHA SUDARSHAN | 15 |
| 5 | 2022014029 | 4833029 | CHOUGALE SHIVLILA PANDURANG | 15 |
| 6 | 2022014176 | 4833038 | NASVALE SANA FARUK | 13 |
| 7 | 2022014157 | 4833047 | MANE ANUJA YUVRAJ | 13 |
| 8 | 2022014234 | 4833049 | SHINDE KARISHMA VILAS | 13 |
| 9 | 2022014252 | 4833053 | ULAPE BHUMI RANJIT | 13 |
| 10 | 2022014044 | 4833054 | DHANGAR PRITI SUNIL | 13 |
| 11 | 2021014784 | 4833077 | Punekar Hujaf Shakil | 13 |
| 12 | 2022014188 | 4833088 | PATHAN SANIYA AAYUBKHAN | 13 |
| 13 | 2022014295 | 4833097 | KHANDEKAR VAISHNAVI UTTAM | 13 |
| 14 | | 4833099 | SHELAR SONALI TANAJI | 14 |
| 15 | 2022014257 | 4833124 | WAGAVEKAR RUTUJA JITENDRA | 14 |
| 16 | 2022014149 | 483312[illegible] | LOKHANDE SWITI PRASHANT | 13 |
| 17 | 2021014674 | 4833136 | MANE KEDAR SHANKAR | 13 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Kulkarni

**Internal Examiner**

**Print Date :** 01/04/2025 3:35:52 PM

8412053997
**Mobile Number**



Scanned with OKEN Scanner

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)

कोल्हापूर

१९६४

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
(Empowered Autonomous)
ESTD
JUNE
1964

Scanned with OKEN Scanner

*"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार "*

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळूंखे

# विवेकानंद कॉलेज

## कोल्हापूर (स्वायत्त)

**विभाग - समाजशास्त्र**

**बी.ए.भाग - 3 Sem - VI**

**प्रकल्प विषय -**

**उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धतीचा अभ्यास करणे.**

**प्रा. एच. व्ही. चामे**

**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**

**मार्गदर्शक :-**

**प्रा. आर्या कुलकर्णी**

**Roll No. - 4958**

**सन - 2024-25**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR * (Empowered Autonomous) *
ESTD
JUNE
1964

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील |
|---|---|
| १ | प्रतिज्ञापत्र |
| २ | प्रस्तावना |
| ३ | उद्दीष्टे |
| ४ | अभ्यासाचे महत्त्व |
| ५ | गृहितके |
| ६ | तथ्यसंकलन पद्धती |
| ७ | नमुना निवड |
| ८ | उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धतीचा अभ्यास करणे. |
| ९ | निष्कर्ष |
| १० | ऋणनिर्देशक |
| ११ | प्रमाणपत्र |
| १२ | संदर्भ सूची |



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, सदरचे संशोधन कार्य आमच्या स्वत:च्या प्रयत्नाने फलित आहे. हे संशोधन यापूर्वी कधीही कोणत्याही पदवीसाठी सदर माहितीच्या आधारे लिहिलेले नसून आम्ही स्वत: संशोधन करुन प्रस्तुत प्रकल्प केलेला आहे. प्रस्तुत प्रकल्प संदर्भ साहित्याचा आधार घेऊन तयार केलेला आहे.

ठिकाण :- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक :-

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | रोल नंबर | सही | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | रुहाना सरदार देसाई | 4946 | Kesal | 15 |
| २ | प्रिती सुनिल धनगर | 4947 | [illegible] | 13 |
| ३ | अनुजा युवराज माने | 4950 | [illegible] | 13 |
| ४ | हुजाफ शकील पुणेकर | 4954 | PUNEKAR | 13 |
| ५ | करिश्मा विलास शिंदे | 4957 | K.V.Shinde. | 13 |
| ६ | वैष्णवी संभाजी तोडकर | 4958 | VSTodkar | 14 |
| ७ | भुमी रणजीत उलपे | 4959 | Bulape. | 13 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षी मी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर या महाविद्यालयात शिकत असून मला समाजशास्त्र या विषयातील औद्योगिक समाजशास्त्र पेपर क्रमांक पंधरा या पेपरचा अभ्यास करण्यासाठी मी, उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धतीचा अभ्यास करणे हा प्रकल्प केला आहे.

आज अवगत यांत्रिक व तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करुन निसर्गातील भौतिक वस्तुवर उद्योगधंद्यामध्ये प्रक्रिया केल्या जातात व उत्पादन केले जाते व उत्पादीत साधनांचा उपभोग घेऊन आपल्या गरजा पूर्ण केल्या जातात. या उत्पादन व एकूण आर्थिक क्रियेतुन मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात. सुरवातीच्या काळात मनुष्य निसर्ग अवस्थेत राहून खाद्य संकलन, शिकार व मासेमारी करत होता. नंतर तो पशुपालन, स्थानांतरीत शेती करु लागला. त्यानंतर प्रगत शेती व शेतीसंबंधीत इतर उद्योग, व्यवसाय याकडे मनुष्य वळला. आता आपल्याला मानवाने औद्योगिक क्रांती केल्याचे दिसते. उद्योगधंद्यातही यंत्रे व तंत्रे यांचा प्रभावी वापर होत आहे. मनुष्य आपल्या निर्वाहासाठी, अस्तित्वासाठी सतत धडपड करीत आला आहे. खाद्यसंकलन ते उद्योगधंदे व सेवा क्षेत्र अशी आर्थिक क्रियांची उत्क्रांती घडून आलेली आहे. उत्पादनाची ही उत्क्रांती कशी होत गेली याचा अभ्यास आपण या प्रकल्पात करणार आहोत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

# उद्दिष्टे

1. प्रारंभीच्या उत्पादन पद्धती समजावून घेता येतील.

2. कारखाना उत्पादन पद्धतीचा उदय, त्या उदयाची कारणे व वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

## अभ्यासाचे महत्त्व

आधुनिक गुंतागुंतीच्या यंत्रोत्पादन पद्धतीचा उदय एकाएकी झालेला नाही. माणूस भटकंती अवस्थेतून उद्योगप्रधान जगात आला. म्हणजेच भटकंती अवस्थेतील समाज ते उद्योगप्रधान समाज अशी मानवी जीवनाची वाटचाल आढळते. या मानवी जीवनातील बदलत्या आर्थिक क्रियांचा व त्यानुसार बदलणाऱ्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# गृहितके

1. आधुनिक गुंतागंतीच्या यंत्रोत्पादन पद्धतीचा उदय एकाएकी झालेला नाही.
2. माणूस भटकंती अवस्थेतून उद्योगप्रधान जगात आला.
3. मानवी जीवनाची वाटचाल ही माणसाच्या प्रारंभिक उत्पादन पद्धतीपासून ते कारखाना उत्पादन पद्धतीपर्यंत आढळते.
4. मानवी जीवनाची वाटचाल ही भटकंती अवस्थेतील समाज ते उद्योगप्रधान समाज अशी आढळते.
5. खाद्य संकलन ते उद्योगधंदे व सेवा क्षेत्र अशी आर्थिक क्रियांची उत्क्रांती घडून आलेली आढळते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# तथ्यसंकलन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये आम्ही तथ्यसंकलन पद्धतीतील प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोत या दोन्ही स्त्रोतांचा वापर तथ्य संकलनासाठी केला आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रामुख्याने मुलाखत अनुसुचीचा वापर केला आहे आणि द्वितीयक स्त्रोतांमध्ये इंटरनेटचा वार करुन प्रकल्पाशी आधारित वेगवेगळी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner


# नमुना निवड पद्धती

प्रस्तुत प्रकल्पासाठी गैर संभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करुन प्रकल्प केला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous)
ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner


**मानवी जीवनाची भटकंती अवस्थेतील समाज ते उद्योगप्रधान समाज अशी झालेली वाटचाल :**



फळे, कंदमुळे, पाने, फुले यांच्यासाठी भटकंती करणारा मानव.




धनुष्यबाण, फास, जाळी, सापळे चोरखड्डे, खड्डे यांचा वापर करुन शिकार करणारा मानव.



टोकणी, फावडे, कुदळ, नांगर यांचा वापर करुन शेती करणारा मानव.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



१६९८ सेव्हरी स्टीम पंप - थॉमस सेव्हरी यांनी बनवलेली पहिले व्यावसायिकरित्या यशस्वी वाफेवर चालणारे उपकरण.



मनुष्याने विकसित यंत्राचा वापर करुन मोठमोठे उद्योगधंदे निर्माण केले.




## उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धती

कोणत्या ना कोणत्या प्रकारची आर्थिक क्रिया केल्याशिवाय माणसाला जिवंत राहण्यासाठी दुसरा पर्यायच नसतो. म्हणूनच माणसाला स्वतःचे अस्तित्त्व टिकविण्यासाठी परिस्थितीनुसार आपल्या आर्थिक क्रिया उद्योग व्यवसायात बदल घडवून आणावा लागतो. खाद्यसंकलन अवस्थेत निसर्गामध्ये उपलब्ध असणाऱ्या वस्तूवरच मानव आपली गुजराण करीत होता. पाने, फुले, फळे, कंदमुळे, मद्य इत्यादीवर मानव आपली भूक भागवत होता. या अवस्थेत मानवाने कोणतीही साधने अगर आयुधे यांचा शोध लावलेला नव्हता. या अवस्थेतूनच मानवाने हळूहळू प्रगती

करुन नवनवीत साधने व आयुधे यांचा शोध लावला. आजची प्रगत यंत्रोत्पादन पद्धती शोधुन काढली. बाष्पशक्तीवरील इंजिनद्वारे चालणारी यंत्रे आली. यांत्रिक ज्ञानाबरोबरच तांत्रिक पद्धतीचा वापर सुरु झाला. आणि अशा यंत्र व तंत्र साधनाद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक क्रिया म्हणजे उद्योगधंदा होय. आणि उद्योधंदा ही गुंतागुंतीची यंत्रोत्पादन पद्धती इंग्लंडमध्ये प्रथम उदयास आली. कारण इंग्लंडमधील शास्त्रज्ञानी शोध लावून त्याचा वापर आर्थिक क्रियेसाठी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

**उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धतींचा विभागणी पुढील तीन प्रकारात होते.**

1. मॅनोरिअल किंवा सरंजामदारी पद्धती
2. संघ पद्धती
3. घरगुती उत्पादन पद्धती (गृहोद्योग उत्पादन पद्धती)

**1. मॅनोरिअल किंवा सरंजामदारी पद्धती :-**

युरोपमध्ये विशेषतः इंग्लंडमध्ये इ.स. ९ व्या शतकापासून ते १२ व्या शतकापर्यंत मॅनोरिअल अगर सरंजामदार पद्धती अस्तित्वात होती. लागवडीयोग्य व बिनलागवडीच्या कुरण जमिनींचे मालक सरंजामदार हे होते. त्यांच्या जमिनीची लागवड त्यांच्या हाताखालील कुळे व भुदासाकडून केली जाईल. जमिन कसण्याच्या या पद्धतीला इंग्लंडमध्ये मॅनार असे म्हणतात. या मॅनॉरमध्ये व्यापारी कारागीर आणि लोहार इ. च्या सेवाही उपलब्ध असत. मॅनोरिअल पद्धती म्हणजे विविध देशांच्या आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा असावा असे वाटते. कारण ही पद्धती केवळ युरोपियन देशात म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन या देशातच आढळते असे नाही तर रशिया जपान व भारत या देशातही ही पद्धती आढळते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

## मॅनोरिअल पद्धतीची रचना व वैशिष्ट्ये :-

- **जमीनदार व सरंजामदार ही राजाची कुळे -**

जमीनदार, सरंजामदार किंवा लॉर्ड हेच जमिनीचे तत्त्वतः मालक असले तरी वास्तवेत फरक होता. कारण जमिनीची अंतिम मालकी राजाी होती. जमिनीचा खरा व खास मालक राजाच असल्यामुळे जमिनदार, सरंजामदार ही राजाची कुळेच असत. त्यामुळे जमिनदार व सरंजामदरांचे अस्तित्व हे राजाच्या मर्जिवर अवलंबून होते. युद्धकाळात सरंजामदारांनी राजाला लष्करी मदत करणे, राजाला निरनिराळ्या कार्यक्रमप्रसंगी नजराणे देणे हे सरंजामदारावर बंधनकार होते. आणि ते त्यांचे कर्तव्य मानले जाई.

- **सरंजामदार व भुदास यांचे श्रेष्ठकनिष्ठ संबंध -**

सरंजामदार व भुदास यांचे संबंध श्रेष्ठ कनिष्टतेचे होते. कारण उत्पादनसाधनावर व जमिनीवर सरंजामदारांची तत्त्वतः मालकी असे. तर भुदास हे प्रत्यक्ष शेतावर राबणारे असत. त्यामुळे भुदास हा सरंजामदारांचाच दास असे कारण त्याच्या जिवीतावर संपूर्ण नियंत्रण सरंजामदाराचेच असे. कित्येकवेळी सरंजामदार हे प्रत्यक्ष राजाविरुद्ध बंड करुन उठत तेव्हा भुदास ही सरंजामदारांची लष्करी शक्ती असे. त्यामुळे सरंजामदार हे सर्वसत्ताधीश होते. तर भुदासांची भूमिका अत्यंत कनिष्ट होती.

- **मॅनॉर हे स्वयंपूर्ण केंद्र होते -**

प्रत्येक मॅनॉर हे आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण केंद्र होते. निर्वाहविषयक गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक त्या सर्व वस्तूंचे उत्पादन मॅनॉरमध्येच होत असे. तसेच सुतार, लोहार, व्यापारी, कारागीर या सर्व सेवा मॅनॉरमध्येच उपलब्ध असत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

- **मॅनॉरमधील वसतिस्थान -**

मॅनॉरमधील वसतिस्थानाची रचना ही देखील वैशिष्ट्यपूर्ण होती. लॉर्ड किंवा सरंजामदार यांचा किल्ला हा मॅनॉरच्या अगदी मध्यवर्ती ठिकाणी असे.

- **लागवड पद्धती -**

त्या काळी जमिनीची लागवड पद्धती खुल्या शेतीची होती. जमिनीची दोन किंवा तीन विभागात केली जात असे. शेताला कुंपन न घालता पिक काढल्यानंतर शेते गुराढोरांना चरण्यास मुक्त ठेवली जात. त्याचबरोबर त्या काळात खतांचा वापर करण्याची पद्धती माहित नसल्याने संपूर्ण जमिनीची दरवर्षी लागवड केली जात असे.

- **सरंजामदारांना न्यायदानविषयक हक्क -**

मॅनॉरमध्ये राहणाऱ्या सर्व लोकांचे भांडणतंटे सोडवणे. त्यांना योग्य तो न्याय देणे. इ. सारखे हक्क सरंजामदारांना होते. कोणताही वाद किंवा तंटा मिटविताना सरंजामदारांचा शब्द महत्त्वाचा मानला जाई.

- मॅनॉरमधील वर्गव्यवस्था -

मॅनॉरमधील संपूर्ण रचनेत दोन प्रकारचे वर्ग होते. पहिला वर्ग वरिष्ठांचा तर दुसरा वर्ग श्रमिकांचा होता. पहिल्या वर्गात सरंजामदार, धर्मोपदेशक आणि सरंजामदारांचे सहाय्यक असत. तर दुसऱ्या वर्गात श्रमिक जमिनीवर राबणारे शेतकरी आणि कारागिरांचा समावेश होताच शिवाय जमिनीवर राबणाऱ्यात दोन वर्ग होते ते म्हणजे कांही खंड देऊन जमिनीवर कसणारा वर्ग तर दुसरा वर्ग भुदासांचा होता.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

**2. संघ पद्धती :-**

सरंजामशाही पद्धतीत शेतकरी व भुदासांची स्थिती दयनीय होती. स्वार्थापोटी सरंजामदार त्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण करीत होते. मान, हक्क , अधिकार आणि स्वातंत्र्य यापासून शेतकरी भुदास वंचित होते. कंटाळलेल्या शेतकरी भुदासांनी प्रवाह बदलायला सुरुवात केली होती. कारण ११ व्या शतकामध्ये युरोपियन राष्ट्रामध्ये शहरांचा उदय होऊ लागला होता. व्यापार वाढीस लागल्याने सरंजामशाही व्यवस्थेमधील घटकांची आर्थिक स्थिती सुधारु लागली. व्यापार करण्यास अनुकूल बनलेल्या परिस्थितीतच १२ व्या शतकात संघ प्रस्थापित करण्यास सुरुवात केली व १३ व्या शतकात या संघ स्थापकांनी वेग घेतला. हे संघ प्रामुख्याने दोन प्रकारचे आहेत.

**अ) व्यापारी संघ :**

व्यापाऱ्यांनी आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठीच संघानी स्थापना केली. सर्व व्यापाऱ्यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय हिसंबंध सारखेच असल्यामुळे ते एकत्र येऊ शकले. शहरातील व्यापार अखंडीत करणे, उपभोक्त्यांना योग्य किंमतीत वस्तू पुरविणे, खरेदी विक्रीवर नियंत्रण ठेवणे, व्यापाऱ्यांचे संरक्षण करणे. इ. कार्य व्यापारी संघ करीत असत. याशिवाय एखादा व्यापारी आजारी पडला किंवा मृत्यू पावला तर सर्व प्रकारची मदत संघाकडून देणे, तसेच धार्मिक व सामाजिक संस्थांचे कार्य देखील या संस्था पार पाडत. वरील कार्यामुळे व्यापारी संघाचे महत्त्व वाढले.

**ब) कारागिरांचा संघ :**

११ व्या शतकात व्यापारी संघाप्रमाणेच विशिष्ट व्यवसाय करणाऱ्या कारागिरांनी एकत्र येऊन एक संघटना स्थापन केली. त्यालाच कारागिरांचा संघ

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR * ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

असे म्हणतात. विणकर, शिंपी, कातडी वस्तू बनविणारे कारागिर सुतार गवंडी, सोनार, लोहार, खाटीक, चांभार यांनी आपआपले कारागिरी संघ स्थापन केले. वस्तूची गुणवत्ता, दर्जा यावर लक्ष केंद्रित करणे, वस्तूंच्या किंमती निश्चित करणे, सदस्यांच्या हिताचे रक्षण करणे ही कार्ये कारागिरांचा संघ करत असत.

कारागिर संघाची रचना कारागिर संघाची रचना वैशिष्ट्यपूर्ण होती. संघटनेच्या रचनेत मालक, शिकावू कामगार व जर्नीमेन यांचा समावेश होता. या रचनेवरुन कारागीर संघटनेची कार्यपद्धती स्पष्ट होते.

### 3. घरगुती उत्पादन पद्धती (गृहोद्योग उत्पादन पद्धती) :-

संघ पद्धती नामशेष झाल्यावर घरगुती उत्पादन पद्धती (गृहोद्योग) चा उदय झाला. नवीन शोध नवीन विचारसरणी, समाजपरिवर्तन यातूनच उद्योगधंद्यांचे स्वरुपही बदलत गेले. व अगदी मंद गतीने घरगुती उत्पादन पद्धतीचा उदय होत गेला व संघ पद्धतीचा जागा घरगुती उत्पादन पद्धतीने घेतली साधारणतः इ.स. १४६४ मध्ये घरगुती उत्पादन पद्धतीचा उल्लेख आलेला दिसतो. १४ व्या शतकात नवीन बाजारपेठा निर्माण झाल्या. मालाला चोहोकडून मागणी वाढली. व्यापारात वाढ झाल्याने नव्या संस्थांचा उदय झाला. व्यापारी भांडवलशाहीचा वर्ग उद्यास आला. हेच व्यापारी कारागीरांना हत्यारे, कच्चा माल पुरवित असत. व कारागिराकडून औद्योगिक उत्पादन करुन घेत असत व याचा परिणाम घरगुती उत्पादन पद्धती सुरु होण्यात झाला.घरगुती (गृहोद्योग) उत्पादन पद्धतीचा रचना व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

**अ) कारागिरांचे घर हेच उत्पादनाचे केंद्र :**

घरगुती उत्पादन पद्धतीत स्वत: कारागिर व मालक उत्पादनाचे कार्य आपल्या स्वत:च्याच घरात करत असत. उत्पादनाचे कार्य, उत्पादनाची पद्धती उद्योजकाच्या (मालकाच्या) इच्छेप्रमाणेच होत असे. कारण उद्योजक अगर मालक अगर संयोजकच कारागिरांना काम पुरवत असत व उत्पादनाचे कार्य कारागिरांच्या घरीच चालू असे. उत्पादनाच्या कार्यासाठी सर्व कामगारांनी एकत्र येण्याचे काहीच कारण नव्हते. मालकाकडून कारागिरांना कच्चा मालाचा पुरवठा केला जाई व मालक कारागिरांच्या घरातुनच उत्पादित माल म्हणजे तयार झालेली वस्तु गोळा करुन घेत असत.

**ब) कामगार हे स्वतंत्र कारागीर असत :**

घरगुती उत्पादन पद्धतीत प्रत्यक्ष उत्पादनाची जबाबदारी ज्या कामगारावर असे ते कामगार स्वतंत्र कारागीर असत. कारागीर संघाच्या उतरत्या काळात असंख्य कामगारांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरु केलेला होता. व्यापार वाढू लागल्याने व्यापारी लोकांनाही अधिक मालाची जरुरी होती. म्हणून त्यांनी खेड्यापाड्यातील कारागिरांना उत्तेजन दिले होते. त्यामुळे कारागीर स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रेरित झाले होते.

**क) यंत्रोत्पादन शक्तीचा अभाव :**

घरगुती उत्पादन पद्धतीत हे कारागीर उत्पादन आपल्या घरीच करत असत. उत्पादनाचे प्रमाण माफकच होते. उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया मानवी बळावरच पार पाडल्या जात होत्या. त्यासाठी यांत्रिक साधनांचा वापर केला जात नव्हता. याचा अर्थ उत्पादनात साधनांचा वापरच केला जात नव्हता असे नाही. तर घरगुती उत्पादन पद्धतीत उत्पादनाची साधने ही अतिशय साधी व लहान स्वरुपाची असत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

# निष्कर्ष

१) मानवी जीवनात 'आर्थिक क्रिया' ही अटळ बाब आहे.

२) सुरुवातीला मासेमारी,शिकार,खाद्य संकलन करत असत,पुढे प्रगत शेती,लघु उद्योग आणि शेवटी प्रचंड उद्योगधंदे असे अनेक टप्पे पार करत मनुष्य आपली आर्थिक क्रिया व उदरनिर्वाह यांची सांगड घालत आला आहे.

३) मनुष्य लाखो वर्षे उत्पादन पद्धती विकसित करण्यात मग्न होता.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# ऋणनिर्देशक

प्रस्तुत प्रकल्प संबंध पूर्ण करत असताना मला मनस्वी आनंद होत आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले व मोलाचे मार्गदर्शन केले त्या सर्वांचे अंतःकरणातून ऋण व्यक्त करुन मी माझे कर्तव्य समजतो कारण मौलिक सहकार्याशिवाय हे प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाले नसते.

सर्व प्रथम विद्यापीठ अनुदान आयोगाने व समाजशास्त्रीय विभागाने मला संधी देऊन प्रकल्प प्रबंधासाठी अनुदान दिले असून त्याबद्दल समाजशात्रीय विभागाचा मी ऋणी आहे.

सदर प्रकल्प मी पूर्ण करु शकतो केवळ विवेकानंद कॉलेज व समाजशास्त्र विभाग यांनी संधी दिल्यामुळे मी,प्रा. एच. व्ही चामे सर समाजशास्त्र विभाग प्रमुख व प्रा. आर्या सुनील कुलकर्णी यांची ऋणी आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत) येथे कला शाखा भाग ३ च्या समाजशास्त्र विभागात शिकत असलेली विद्यार्थीनी वैष्णवी संभाजी तोडकर सत्र ६ च्या अंतर्गत मूल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प "उत्पादनाच्या प्रारंभिक पद्धतीचा अभ्यास" करणे हा या विद्यार्थीनीने स्वतः तयार केलेला असून आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरित्या पूर्ण झालेला आहे.

दिनांक : 30/04/2025

ठिकाण : कोल्हापूर

**प्रा. एच. व्ही. चामे**

**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**

**मार्गदर्शक :-**

**प्रा. आर्या कुलकर्णी**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# संदर्भसूची

प्रस्तुत प्रकल्प प्रबंधासाठी इंटरनेटच्या माध्यमातुन व पुस्तकाच्या माध्यमातुन माहिती मिळवलेली आहे.


१. https://socialwelfare.vikaspedia.in

२. पुस्तकाचे नाव : औद्योगिक समाजशास्त्र - लेखक : प्रा.पी.के.कुलकर्णी



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner